# पेरूगेट भावे स्कूल

कै. वामन प्रभाकर भावे हे मूळचे रत्नागिरी जवळील भावे आढंब या खोती गावातले. कै. वामनरावांचे आजोबा कै. विनायक भावे हे आपल गाव सोडून पुण्यात आले. त्यांनी कॉन्ट्रॅक्टरचा व्यवसाय केला. त्यात ते यशस्वी झाले. त्यांचे पुत्र प्रभाकरराव यांनी सावकारी केली. प्रभाकररावांना तीन पुत्र झाले. वामनराव हे त्यांचे द्वितीय पुत्र सन १८५० मध्ये वामनद्वादशीच्या दिवशी जन्म झाला म्हणून त्यांचे नाव वामन ठेवण्यात आले. त्यांचे इंग्रजी शिक्षण पुण्यात विश्रामबागवाड्यातील हायस्कूलमध्ये झाले. ते मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाले. दुर्दैवाने त्यांच्या वडिलांच्या मृत्यूमुळे डेक्कन कॉलेज मधील आपले शिक्षण त्यांना सोडून द्यावे लागले. बोमनसाहेबांच्या मिशनरी शाळेत त्यांनी शिक्षक म्हणून नोकरी स्विकारली. धार्मिक कारणांमुळे मतभेद होऊन त्यांनी ती नोकरी सोडली आणि दि पुणे नेटिव्ह इन्स्टिट्युशन ही शाळा चालविली. त्यांच्या ध्येयनिष्ठ, चिकाटी, स्वार्थ त्यागी वृत्तीमुळे शाळेला अल्पावधीतच प्रतिष्ठा आणि नावलौकिक प्राप्त झाला.

इंग्रजी शाळेस यश मिळाल्यानंतर शिक्षणात एकसुत्रता असावी. प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व ओळखून १८९६ मध्ये संस्था चालकांनी प्राथमिक शाळा सुरू केली. श्री. भावे यांच्या मृत्युनंतर संस्थाचालकांनी शाळेला श्री. भावे यांच्या पुण्यस्मरणार्थ भावे प्राथमिक शाळा असे नाव दिले. पुण्याच्या शिक्षण क्षेत्रात आजही एक उत्तम शाळा म्हणून ही शाळा प्रसिद्ध आहे. श्री. भावे व त्यांच्या सहाध्यायांनी महाराष्ट्र कॉलेज सुरू केले. तथापि पुण्यातील प्लेग, शासनाचे धोरण, राष्ट्रप्रेमी शिक्षकांवरील अवकृपा या सर्वांचा परिणाम शाळेवर होऊ नये म्हणून हे कॉलेज तीन वर्षांनी बंद केले.

कै. भावे त्यांच्या कार्यामुळे समाजात कर्तव्यनिष्ठ, बाणेदार, निगर्वी वृत्तीचे म्हणून प्रसिद्ध होते, आदरणी होते. शिक्षणाव्यतिरिक्त इतर सामाजिक कार्याची त्यांना आवड होती. पुणे शहर म्युनिसिपालिटीत ते लोकनियुक्त सभासद म्हणून निवडून गेले. स्कूलबोर्डाचे चेअरमन म्हणूनही त्यांनी काम केले.

भावे स्कूलच्या रूपाने त्यांनी लावलेले छोटे रोपटे आता एका विशाल वृक्षात रूपांतरित झाले आहे. शाखोपशाखांनी बहरले आहे. पुणे शहराबाहेर शाळा, पुण्यात महाविद्यालये, मुलींसाठी सैनिकी शिक्षण देणारी शाळा, अत्याधुनिक असे तंत्रज्ञान, व्यवस्थापन या शाखांचे उच्च शिक्षण देणारी संस्था म्हणून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहे.

भावे स्कूलचे अनेक विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रात नामवंत आहेत. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर कीर्ती प्राप् करून शाळेला व संस्थेला सन्मान मिळवून दिला आहे.

आपल्या जीवनात निष्ठेने, समर्पित भावनेने काम करणारे श्री. वा. प्र. भावे २९ मे १८९९ रोजी कर्जत येथे निधन पावले. त्यांच्या कार्यापुढे नतमस्तक व्हावेसे वाटते.

**(हा लेख शाळेच्या हिरक महोत्सवानिमित्त प्रकाशित केलेल्या स्मारक - इतिहास - ग्रंथ याच्या आधारे लिहिलेला आहे.)**

**- सौ. स्वाती भावे**

**(उपमुख्याध्यापिका म.ए.सो. मुलांचे विद्यालय, पेरुगेट, भावेस्कूल)**